10-12-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

MSS/ D/ MMP/ 11:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राज्यातील माध्यमिक शाळांमधील पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता देणेबाबत**

**(१) * ४५३२२ डॉ. अपूर्व हिरे , डॉ.सुधीर तांबे , श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.एम.एम.शेख , श्री.सतीश चव्हाण , श्री.किरण पावसकर , श्री.राणा जगजितसिंह पाटील , श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ४१६६२ ला दिनांक २२ जुलै, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक संवर्गातील ९१८ वाढीव पदांसाठी वित्त विभागाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर विहित कार्यपध्दतीनुसार करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) तसेच राज्यातील उच्च माध्यमिक व माध्यमिक विद्यालयांमध्ये कार्यभारामुळे वृध्दी झालेल्या वाढीव पदांना शासनाने सन २००८-२००९ पासून मान्यता दिली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३)असल्यास, दिनांक २१ जून, २०१३ मध्ये झालेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीत सादर प्रस्तावानुसार पायाभूत पेक्षा वाढीव पदांना मान्यता देणेबाबत पुढे कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व सदरचा निर्णय केव्हापर्यंत घेणे अपेक्षित आहे ?

**प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता :** (१) कार्यवाही सुरु आहे.

(२) होय.

(३) व (४) ९१८ शिक्षकीय वाढीव पदांचा प्रस्ताव चक्रीय पद्धतीने मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता वित्त विभागाने पुन्हा काही मुद्यांबाबत माहिती मागविली असून त्यानुसार प्रस्ताव पुन्हा वित्त विभागास सादर करण्यात येत आहे.

डॉ. अपूर्व हिरे : सभापती महोदय, गेल्या १० वर्षापासून ९१८ शिक्षकांना वेतन मिळालेले नाही. या शिक्षकांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करुन ही पदे रेग्युलराईज करण्यात येतील काय ?

प्रा. फौजिया खान : हा वाढीव पदांचा आणि पदांना मान्यता मिळण्याचा प्रश्न आहे. या पदांवर कोणीही नियुक्त झालेले नाही. २००१ ते २००९ पर्यंतच्या ९१८ शिक्षकांचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीकडे गेलेला असून त्या समितीने काही त्रुटी काढलेल्या आहेत. त्यांनी सीबीएसई आणि आयसीएससीच्या स्टाफिंग पॅटर्नबाबत विचारणा केलेली आहे. त्या संदर्भात विभागाने

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

उच्चस्तरीय समितीकडे खुलासा केलेला आहे. शिक्षकेतर कर्मचा-यांच्या बाबतीत संयुक्त सचिव

..२..



ता.प्र.क्र.45322....

समितीने असे सांगितले की, आकृतिबंध निश्चित झाल्यानंतर आणखी पदे देऊ नयेत. दिनांक १०.९.२०१३ ला शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध निश्चित झालेला असून तो देखील उच्चस्तरीय समितीकडे पाठविण्यात येईल.

प्रा. वसंतराव खोटरे : हा प्रश्न या सभागृहामध्ये 10 ते 12 वेळा उपस्थित झालेला आहे. चक्रीय पध्दतीने मान्यता देण्याचा विचार सुरु आहे असे शासनाने सांगितलेले आहे. हे शासन शिक्षकांना चक्रासारखे फिरवत राहिलेले आहे. 2003 पासून या पदांना मान्यता मिळालेली नाही. ही चक्रीय पध्दत कोणती आहे, आतापर्यंत किती पायाभूत पदे वाढलेली आहेत, तसेच हे हिवाळी अधिवेशन संपण्याच्या आत या शिक्षकांना वेतन मिळेल काय ?

प्रा. फौजिया खान : ही प्रक्रिया लवकरात लवकर व्हावी यासाठी ही चक्रीय पध्दत आहे. बैठकांमध्ये वेळ न दवडता एकाच वेळी फाईलवर निर्णय व्हावा अशी विभागाची भूमिका आहे.

श्री. रामनाथ मोते : ही 10 वर्षापासूनची पदे असल्यामुळे या पदांना लवकरात लवकर मान्यता मिळणे आवश्यक आहे. या पदावर कोणीही नियुक्त झालेला नाही असे माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले ते योग्य नाही. रिक्त पदावर हे शिक्षक 10 वर्षापासून विनावेतन काम करीत आहेत. ही सर्व पदे 100 टक्के अनुदानावरची आहेत. या पदांना तातडीने मान्यता देऊन शिक्षकांना लवकरात लवकर वेतन देण्यात येईल काय ?

प्रा. फौजिया खान : संस्थेने ही पदे भरली असतील तर ती अनधिकृत आहेत. या पदांना कोणतीही मान्यता देण्यात आलेली नाही. ही पदे नियमित झालेली नाहीत. आम्हाला वस्तुस्थिती माहीत आहे. या बाबतीत लवकर मार्ग निघावा यासाठी त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव चक्रीय पध्दतीने मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून उच्चस्तरीय समितीचा अंतिम निर्णय होणार आहे.

श्री. कपिल पाटील : माननीय राज्यमंत्री महोदयांनी ही पदे अनधिकृत आहेत असे जे म्हटले ते आक्षेपार्ह आहे. शिक्षकांची पदे भरली नाहीत तर विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान होणार नाही काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45322...

श्री.कपिल पाटील....

या संदर्भात वित्त विभाग आणि नियोजन विभाग वारंवार त्रुटी काढतात, या विभागांकडून गेल्या दहा वर्षांपासून त्रुटी काढण्याचे काम सातत्याने सुरु आहे. संबंधितांनी त्रुटी काढल्यानंतर शिक्षण अधिकाऱ्यांनी किमान एक बैठक त्यांच्यासमवेत घेणे आवश्यक आहे. बैठकीत चर्चा करुन या बाबतीत त्रुटी काढल्या गेल्या पाहिजेत. त्रुटींची पूर्तता केली जात नाही म्हणून सदरची फाईल प्रत्येक विभागात फिरत राहते. म्हणून ही बैठक तुम्ही तातडीने घेणार काय ?

प्रा.फौजिया खान : महोदय, याबाबतीत तातडीने पाठपुरावा करण्यात येईल.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, शिक्षकांची ही अनधिकृत पदे आहेत. ती पदे भरली नाहीत तर विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे फार मोठे नुकसान होईल. आजच सकाळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, आपली ताकद ही लोकसंख्या आहे, या लोकांना चांगल्या दर्जाचे शिक्षण देणे गरजेचे आहे. राज्यात विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे म्हणून ही पदे लवकरात लवकर भराल काय आणि ती पदे भरण्यासंबंधी निश्चित कालावधी किती असेल यासंबंधी थोडीशी स्पष्टता द्यावी.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी मघाशी असे सांगितले की, या पदांना शासनाने मान्यता दिलेली नाही. संस्थांनी शिक्षकांची पदे भरली असल्यामुळे त्या संस्थांनीच त्यांचे वेतन अदा करावे अशी अपेक्षा आहे. ज्यावेळी पदे निर्मित होतील, त्यावेळी ते शासनाचे दायित्व असेल. सदरहू शिक्षकांची पदे लवकरात लवकर निर्मित व्हावीत याबाबतीत शासन पावले उचलीत आहे.

डॉ.दीपक सावंत : महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितले की, सदरहू शिक्षकांची पदे अनधिकृतपणे भरली गेली, असे आक्षेपार्ह विधान माननीय शालेय राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी केलेले आहे. विषय शिक्षक नसतील तर विद्यार्थ्यांना विषयांचे शिक्षण देण्यासाठी शिक्षक कोठून आणावयाचे, शिक्षक नसतील तर शाळा कशा काय चालवावयाच्या असे मोठे प्रश्न शिक्षण संस्था चालकांसमोर उभे राहिलेले आहेत. आपण एकीकडे म्हणतो की, सर्वांना शिक्षण दिले पाहिजे. शिक्षण देण्याचा हक्क आहे. शिक्षणाचा हक्क यासंबंधीचे विधेयक सभागृहात मंजूर केले आहे. दुसऱ्या बाजूला मात्र विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी शिक्षक पुरवू शकत नाही. 10 हजार शिक्षक वेतनाविना आहेत. या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी देखील

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45322...

डॉ.दीपक सावंत.....

मघाशी उल्लेख केला आहे. या बाबतीत राज्य शासन काय कार्यवाही करणार आहे या बाबतची स्पष्ट माहिती समागृहात सांगावी. भविष्यकाळात आम्ही करणार आहोत असे कृपया शासनाने या प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर देऊ नये. या बाबतीत शासनाने कोणत्या प्रकारचा कालबध्द कार्यक्रम आखलेला आहे याची देखील माहिती सभागृहाला देण्यात यावी.

डॉ.फौजिया खान : सदर शिक्षकांची पदे अनधिकृत आहेत असे मी सांगितले. ती माहिती देण्यामागचा माझा उद्देश असा आहे की, या शिक्षकांच्या पदांना शासनाची मान्यता नाही. परंतु संस्था चालकांनी शिक्षकांची पदे भरली तर त्या संस्थांनीच त्या शिक्षकांचे पगार दिले पाहिजेत असे अपेक्षित आहे. शासनाकडून अनुदानित संस्थांना परवानगी दिली जाते. संस्था चालकांनी स्वत: शिक्षकांची पदे भरलेली असल्यामुळे त्यांचे दायित्व हे त्या संस्थानीच उललले पाहिजे. काही शिक्षण संस्थांनी शिक्षकांचे पगार देण्याचे दायित्व उललले आहे ही चांगली बाब आहे. यासंदर्भात ज्या काही त्रुटी आढळून आल्या आहेत, आता उच्चस्तरीय समितीच्या त्रुटी बाबत कार्यवाही करावयाची आहे.त्याचा प्रस्ताव संचालकांकडून शासनाकडे प्राप्त झालेला आहे, त्याबाबत शासनाने कार्यवाही केली आहे. त्यांनी सीबीएसई आणि आयसीएसई च्या स्टाफिंग पॅटर्न बाबत विचारणा केली होती. स्टाफिंग पॅटर्नचा याच्याशी काहीही संबंध नाही असा विभागाचा अभिप्राय आहे आणि तसा अभिप्राय कळविण्यात आला आहे.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## ग्रँट रोड (मुंबई) येथील रॉबर्ट मनी टेक्निकल हायस्कुल व कनिष्ठ विद्यालयाने अनुदानित शाळेची प्रवेशप्रक्रिया बंद केल्याबाबत

**(२) * ४५२१५ श्रीमती विद्या चव्हाण , श्री.विक्रम काळे , डॉ.सुधीर तांबे , श्री.सतीश चव्हाण , श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी , श्री.किरण पावसकर , श्री.राणा जगजितसिंह पाटील , श्री.वसंतराव खोटरे :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रँट रोड (मुंबई) येथील रॉबर्ट मनी टेक्निकल हायस्कूल व कनिष्ठ विद्यालय व्यवस्थापनाने शासनाची कोणतीही परवानगी न घेता या जागेचा व्यावसायिक उपयोग करण्यासाठी अनुदानित शाळेची प्रवेश प्रक्रिया बंद करुन येथील २० ते ३५ वर्षे नियमित सेवा केलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना गैरमार्गाने नोकरीतून कमी केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१३ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईतील लहान-मोठया ३३ तंत्रनिकेतनातील शिक्षकांची पदे रिक्त आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उपरोक्त हायस्कूल पुन्हा सुरु करणेबाबत तसेच अन्य तंत्र निकेतनातील शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.डी.पी.सावंत,श्री. राजेश टोपे यांच्याकरिता :** (१) होय.

(२) होय,मुंबई विभागातील अशासकीय तंत्र माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर १०५ पदे रिक्त आहेत.

(३) नाही.

(४) संस्था बंद करण्याचा निर्णय संस्थास्तरावर घेतलेला असल्याने महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ नियम २५-ए नुसार लागू होतील.

४...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने प्रथम लेखी उत्तर दिले होते, ते उत्तर रद्द करुन सदरहू प्रश्नास सुधारित उत्तर दिलेले आहे. शासनाने नियम २५ ए चा बडगा उगारलेला आहे. मला सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे की, नियमाप्रमाणे सह संचालक, शिक्षण आणि मॅनेजमेंट यांची बैठक लावून यासंबंधी ठराव आणि रेग्युलेशन पास करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता परस्पर कारभार केला गेलेला आहे, या ठिकाणच्या ज्युनिअर प्रोफेसर आणि शिक्षकांची सेवा जवळपास ३० ते ३५ वर्षे एवढी झालेली आहे. यात ज्युनिअर प्रोफेसर १० व शिक्षक ७ अशा एकूण १७ लोकांना सेवेतून कमी करुन मे, २००० पासून त्यांना पगारही दिलेले नाहीत. शिवाय या प्रोफेसर आणि शिक्षकांवर कारवाई सुध्दा करण्यात आली आहे, त्यांच्यावर करण्यात आलेली कारवाई पूर्णपणे नियमबाहय आहे. या लोकांना कोणत्या नोकऱ्यांमध्ये समाविष्ट करुन घेणार आहात याचे मला उत्तर हवे आहे.

यानंतर श्री.शिगम...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45215....

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, रॉबर्ट मनी टेक्नीकल हायस्कूल आणि कनिष्ठ विद्यालय व्यवस्थापनाने त्यांचे प्रवेश 50 टक्क्यापेक्षा कमी होत असल्याने एक ठराव करुन संस्था बंद करण्याचा निर्णय 2012 मध्ये घेतला.

श्री.कपिल पाटील : मंत्री महोदयांनी संस्थेची बाजू घेऊ नये.

श्रीमती विद्या चव्हाण : संस्थेने प्रवेश बंद केले आहेत.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, संस्थेने कशा प्रकारची कार्यवाही केली हे मी सभागृहाला सांगू इच्छितो. मी कोणाची बाजू घेतलेली नाही. वस्तुस्थिती सभागृहासमोर आणू इच्छितो. संस्था एमईपीएस ॲक्ट अंतर्गत कव्हर होते. ॲक्टमधील नियम 25 (अ) मध्ये 1987 च्या अमेंडमेंटनुसार संस्था क्लोजर करण्यासाठी संस्थेने ठराव मंजूर करुन तो संचालकांकडे पाठविला. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ट असून आजही सुनावणी सुरु आहे. आजच त्या संदर्भात निर्णय येणे अपेक्षित आहे. संस्थेने नियम 25(अ) प्रमाणे तीन महिन्यांची नोटीस देऊन कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. संबंधित कर्मचाऱ्यांनी शाळा न्यायाधिकरणाकडे या निर्णयाबाबत आव्हान दिले असून आजही सुनावणी सुरु आहे. जो निर्णय कोर्ट देईल त्यानुसार शासन कार्यवाही करील.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, या प्रश्नाबाबत सभागृहात गंभीर चर्चा होत आहे याचा मला आनंद होत आहे. कारण मी रॉबर्ट मनी शाळेचा माजी विद्यार्थी आहे. मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना एका कोपऱ्यात सारुन टेक्नीकल हायस्कूल बंद करण्याचा निर्णय घेतला असून त्या संदर्भात सुनावणी सुरु आहे. शासनाने या संदर्भात अंतिम निर्णय घेतला नसल्यामुळे दोन प्रश्नांबाबत मंत्री महोदय उत्तर देऊ शकतील असा मला विश्वास वाटतो.

सभापती महोदय, बॉम्बे झोरास्ट्रियन असोसिएशन ट्रस्टची ही शैक्षणिक संस्था चॅरिटी कमिशनर यांच्याकडे रजिस्टर झालेली आहे. त्यामुळे संस्था बंद करण्याकरिता चॅरिटी कमिशनर यांची परवानगी घेण्यात आली आहे का? ही शाळा 177 वर्षे जुनी आहे. या शाळेची इमारत हेरिटेज वर्गात मोडते. त्यामुळे हेरिटेज नॉर्म आणि फायर ॲंड सेफ्टी नॉर्मचा भंग संस्थेने केला आहे हे खरे आहे काय? या दोन्ही गोष्टीमध्ये तथ्य असेल तर शासन याबाबत चौकशी करणार आहे का?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी हा प्रश्न संस्थेतील कर्मचाऱ्यांना काढून टाकल्याबद्दल विचारला आहे. चॅरिटी कमिशनर यांची परवानगी किंवा हेरिटेज इमारतीबाबतचा प्रश्न विचाराधीन नाही. संस्था बंद करण्याबाबत क्लोजरची नोटीस दिली गेली असून हा प्रश्न शासन स्तरावर विचाराधीन आहे. चॅरिटी कमिशनर यांची परवानगी घेतली किंवा नाही याची माहिती आज उपलब्ध नाही. ती माहिती पटलावर ठेवू. माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी प्रश्न विचारल्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे प्रतीक्षा यादीवर ठेवून त्यांना समायोजित करता येईल का या संदर्भात शासन नक्की विचार करील.

नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45215....

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सामाजिक कामाच्या नावाखाली शासनाची जागा घेऊन त्या जागेवर शाळा काढण्यात आली आहे. ही शाळा मोक्याच्या ठिकाणी आहे. सदर शाळा बंद असल्यामुळे कर्मचाऱ्यांना वाऱ्यावर सोडण्यात आले आहे. या शाळेच्या जागेवर मॉल उभारण्याचा व्यवस्थापनाचा शुद्ध हेतू आहे असे दिसते. तेव्हा सदर जमीन ताब्यात घेण्यासाठी शासन कोणती पावले उचलणार आहे ? गेले आठ महिने समायोजन करण्यात यावे अशा प्रकारची मागणी या शाळेतील शिक्षक कर्मचारी करीत आहेत. त्यासंबंधी शासन कोणती पावले उचलणार आहे याबाबतचे दमदार उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, नियमामध्ये अशी तरतूद आहे की, 25 (ए) अंतर्गत क्लोजर होते तेव्हा त्या संस्थेतील कर्मचाऱ्यांना प्रतीक्षा यादीवर ठेवून दुसऱ्या संस्थेमध्ये सामावून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. तेव्हा या कर्मचाऱ्यांचे नियमाप्रमाणे समायोजन करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, येथे 25 (ए) चा उल्लेख वारंवार करण्यात आला आहे. यात आपल्या संचालकांनीच नियमांचे उल्लंघन केले आहे. श्री.भुतांगे, संचालक व श्री.आसावा सहसंचालक यांनीच शाळा व्यवस्थापनाशी हातमिळवणी केली आहे. तेव्हा या दोघांची शासन चौकशी करणार आहे काय ? 17 जणांना नोकरीला मुकावे लागले आहे. 1948 साली या शाळेच्या उद्‌घाटनाला लॉर्ड माऊंटबॅटन आले होते. एवढी ऐतिहासिककालीन ही वास्तू आहे. या जागेवर आता दुसरे काही तरी करावयाचे आहे. शारदाश्रम टेक्निकल हायस्कूल, डिसिल्वा टेक्निकल हायस्कूल, साबुसिद्धीकी, फादर ॲग्नेल टेक्निकल कॉलेज, सांताक्रूझ येथील टेक्निकल कॉलेज या ठिकाणी या कर्मचाऱ्यांना सामावून घेणे शक्य आहे. परंतु, तसे करण्यात आले नाही. या कर्मचाऱ्यांना मे 2013 पासून पगार देखील मिळालेले नाहीत. या प्रश्नासंबंधी श्री.भुतांगे व श्री.आसावा यांनी शाळा व्यवस्थापनाकडे जाऊन चर्चा करणे अपेक्षित होते. परंतु, यात नियमबाह्य कृती झालेली आहे. सर्व कागदोपत्री पुरावे देखील आहेत. तेव्हा या संबंधी चर्चा घ्यावी अशी माझी विनंती आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, शासन या सर्व कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत सामावून घेणार आहे काय?

ता.प्र.क्र.45215....

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, या संदर्भात सकारात्मक विचार करण्यात येईल.

**सभापती** : या प्रश्नाला सन्माननीय राज्यमंत्र्यांनी अजूनही अचूक उत्तर दिलेले नाही असे मला वाटते. त्यामुळे मी हा प्रश्न राखून ठेवतो.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी या प्रश्ना संबंधी थोडे स्पष्टीकरण करू इच्छितो. मला आपण दोन मिनिटांची संधी द्यावी. सभागृहामध्ये महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. मी या प्रश्नासंबंधी दोनच मुद्दे मांडणार आहे. MEPS ॲक्टमध्ये 25 (ए) आणि 26 अशा दोन वेगवेगळ्या तरतुदी आहेत. या ॲक्ट मधील कलम 26 खाली सर्व करावे अशी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा आहे. कलम 26 एवढेच सांगते की, शासनाने स्वत:हून शाळा बंद केली तर शासन स्वत: कार्यवाही करू शकते.

यानंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ MMP/ प्रथम श्री. भारवि.... 11:20

ता.प्र.क्र. :45215......

श्री.राजेश टोपे ....

परंतु एमईपीएस ॲक्ट मधील नियम 25-ए मध्ये स्पष्ट तरतूद करण्यात आली असून त्यानुसार स्वत: संस्था क्लोजर करु शकते. या प्रश्नाचे दोन पध्दतीने सकारात्मकपणे उत्तर देता येऊ शकते. ही पहिलीच केस आहे असे नाही तर या अगोदर दोन तीन केसेस नियम 25- ए अनुसार झ ालेल्या आहेत. 1987 मध्ये 25-ए हा नियम मॅनेजमेंटच्या हितार्थ जाणीवपूर्वक अमेंड करण्यात आला होता. ही मराठी माध्यमाची शाळा असल्यामुळे साऊथ मुंबई मध्ये या शाळेला विद्यार्थी मिळत नाही. परंतु या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना जाणीवूपर्वक प्रवेश देण्यात आला नाही अशी सन्माननीय सदस्यांची भावना आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने मी दोन प्रकारे पॉझीटीव्ह उत्तर देऊ इच्छितो. अशा पध्दतीने शाळेतील कर्मचाऱ्यांची नोकरी संपुष्टात येते अशा कर्मचाऱ्यांना पूर्वी सुध्दा वेटींग लिस्ट नुसार नोकऱ्या देण्यात आलेल्या आहेत. मुंबई विभागातील अशासकीय तंत्र माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एकंदर 105 जागा रिक्त आहेत अशी माहिती उत्तरात देखील देण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी सांगितले आहे की, या या ठिकाणी जागा रिक्त आहेत. सगळया ठिकाणी वेटींग लिस्टवर नोकऱ्या देण्याची तरतूद नियम 25-ए नुसार आहे. या पूर्वी सुध्दा अशा प्रकारच्या कर्मचाऱ्यांना समाविष्ट करण्यात आले होते त्यामुळे या कर्मचाऱ्यांना सुध्दा जाणीवपूर्वक समाविष्ट केले जाईल हे मी या ठिकाणी जाणीवपूर्वक सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मुंबई मधील शाळा बंद करुन त्या ठिकाणी मॉल, इंग्रजी माध्यमांच्या शाळा किंवा दुसऱ्या गोष्टी सुरु करण्यात येतील असे अनेक सन्माननीय सदस्यांना वाटते. त्यामुळे यासंदर्भात काळानुरुप नियम 25-ए मध्ये बदल करण्याची गरज आली असेल तर त्याबाबतीत सुध्दा सुधारणा करण्याचा विचार शासनाच्या वतीने तातडीने करण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

या ठिकाणच्या शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर 17 कर्मचाऱ्यांच्या संदर्भात शासन म्हणून आम्हाला 100 टक्के सहानुभूती आहे. परंतु नियम 26 अनुसार या कर्मचाऱ्यांना आम्हाला डायरेक्ट समाविष्ट करता येत नाही. या ठिकाणचे कर्मचारी दोनदा हायकोर्टात गेले होते परंतु कोर्टाने सुध्दा या कर्मचाऱ्यांना डायरेक्ट रिलीफ दिला नाही. या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात आम्हाला सहानुभूती

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :45215......

श्री.राजेश टोपे ....

असल्यामुळे मी आपल्याला दोनच गोष्टी सांगू इच्छितो की, या कर्मचाऱ्यांना 100 टक्के समायोजित करण्याचा प्रयत्न विभागाच्या वतीने जाणीवपूर्वक करण्यात येईल तसेच गरज पडत असेल तर मोठया दृष्टिकोनातून सेक्शन 25-ए डिलीट करण्याचा विचार करण्यात येईल.

**सभापती** : मंत्री महोदयांनी या प्रश्नाच्या संदर्भात आता जे उत्तर दिलेले आहे त्यामुळे सभागृहाचे समाधान झालेले आहे असे मला वाटत नाही. या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदय श्री. राजेश टोपे यांनी 10-12 मिनिटे माहिती दिलेली आहे. या प्रश्नाच्या संदर्भात नेमकी अडचण काय आहे तसेच या प्रश्नाच्या संदर्भात कोणती कलमे आहेत याची माहिती त्यांनी या ठिकाणी दिलेली आहे. या ठिकाणी मी सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, माननीय मंत्री महोदयांनी या प्रश्नाच्या संदर्भात जी माहिती दिलेली आहे त्या माहितीमुळे या प्रश्नाची सोडवणूक झ ाली आहे काय ?

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी प्रश्नाची सोडवणूक न करता फसवणूकच केली आहे.

**सभापती** : या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदयांनी जी काही माहिती दिली आहे त्यासह तसेच अन्य काही महत्वाच्या बाबी आहेत त्याच्यासह या प्रश्नाचे उत्तर यावे अशी माझी अपेक्षा असल्यामुळे मी हा प्रश्न राखून ठेवत आहे.

---------

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ MMP/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 11:25

**राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील**

**तफावत दूर करणेबाबत**

**(3) * 45122 श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे , डॉ.सुधीर तांबे ,श्री.एम.एम.शेख , श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 41877 ला दि. 29 जुलै 2013 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या (5व्या वेतन आयोगाप्रमाणे) वेतन श्रेणीमधील तफावत दूर करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणण्याकरिता शासनाचा विचार पूर्ण झाला आहे, हे खरे आहे, काय,

(2) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री. राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1), (2) व (3) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न या सभागृहात 10 ते 15 वेळा उपस्थित झालेला आहे. महाराष्ट्र कनिष्ठ महासंघाने दिनांक 1.2.2013 रोजी राज्य शासनास निवदेन दिले होते. त्यावर चर्चा झाली त्यानंतर त्यांनी संप केला. दिनांक 13.3.2013 रोजी या विषयावर लक्षवेधी सूचना देण्यात आली. त्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने माननीय शिक्षण मंत्र्यांनी दोन्ही सभागृहात त्यांच्या तीन मागण्यांच्या संदर्भात लेखी आश्वासन दिले. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या तीन मागण्या आहेत. त्यापैकी पहिली मागणी अशी की, दिनांक 1.1.1996 पासून लागू त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करुन, दिनांक 1 जानेवारी, 2006 पासून मानीव वेतनवाढ देऊन फरकाची रक्कम देणे. दुसरी मागणी अशी की, 42 दिवसांच्या संप काळातील रजा पूर्व खात्यावर जमा करणे आणि तिसरी मागणी विनाअनुदानितमधील सेवा वरिष्ठ आणि निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरावी. त्यानंतर दिनांक 2 ऑगस्ट रोजी पुन्हा या विषयावर लक्षवेधी सूचना देण्यात आली त्यावेळी माननीय शिक्षण मंत्री महोदयांकडून दोन महिन्यात कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले. परंतु आज नऊ महिने उलटून गेले तरीही अद्याप शासनाकडून कार्यवाही करण्यात आलेली नाही. कनिष्ठ

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45122....

श्री.वसंतराव खोटरे...

महाविद्यालयीन शिक्षकांच्या तीन मागण्यांच्या संदर्भात दोन्ही सभागृहात आश्वासन देण्यात आले परंतु त्या आश्वासनाची पूर्तता अजूनपर्यंत का करण्यात आली नाही, हे अधिवेशन संपण्यापूर्वी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्या पूर्ण करणार का, माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेले आश्वासन पूर्ण करणार का ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मला या प्रश्नाची थोडी पार्श्वभूमी सांगणे आवश्यक आहे. दिनांक 10 डिसेंबर, 1998 रोजी राज्यातील सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी लागू झाली. शालेय शिक्षण विभागाने ती वेतनश्रेणी दिनांक 13 मे, 1999 रोजी लागू केली. दिनांक 1.1.1996 पासून ती उच्च माध्यमिक स्तरावर लागू करण्यात आली. मला येथे आवर्जून सांगितले पहिजे की, उच्च माध्यमिक आणि जे वेगवेगळे घटक आहेत त्यांना पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यात आली होती आणि 1.1.1996 पासून त्याची अंमलबजावणी करण्याची सूचना दिलेली आहे. त्यावेळी प्रथमश्रेणी आणि वरिष्ठश्रेणी अशा दोन श्रेणी देण्यात आल्या होत्या .. (अडथळा)..

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलू लागले तर माननीय मंत्री महोदय उत्तर कसे देणार ? मी सन्माननीय सदस्यांना उप प्रश्न विचारण्याची संधी देणार आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मला या प्रश्नाची पार्श्वभूमी सांगणे आवश्यक आहे. शासनाने जी सुधारित वेतनश्रेणी दिलेली आहे ती केंद्र सरकारपेक्षा खूप जास्त आहे. रुपये 6500 ते 10,000 ही वेतनश्रेणी होती ...

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

**सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, कृपया आपण खाली बसावे. आपण खाली बसायचे नाही असे ठरविले असेल तर ते बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांनी उप प्रश्न विचारुन माननीय मंत्री महोदयांकडून जरुर उत्तरे काढून घ्यावीत. परंतु माननीय मंत्री महोदयांना प्रथम त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे. मी आपणास उप प्रश्न विचारण्याची संधी देणार आहे. माननीय मंत्री महोदयांनी कोणते उत्तर द्यावे हे मी त्यांना सांगू शकणार नाही. सन्माननीय सदस्यांनी

..3..



AJIT/ D/ MMP/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 11:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सभापती**......

ता.प्र.क्र.45122....

माननीय मंत्री महोदयांना अचूक उपप्रश्न विचारुन त्यांच्याकडून अचूक उत्तर काढून घ्यावे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, त्यांना केंद्र सरकारपेक्षा जास्त वेतनश्रेणी देण्यात आली होती. असे असताना देखील दिनांक 3.2.2000 रोजी शासनाने जी.आर.काढून मोठ्या प्रमाणावर आर्थिक भार स्वीकारला. त्यानंतर देखील शिक्षकांकडून वेळोवळी मागणी करण्यात आली आणि शासनाने त्यांच्या मागण्यांकडे लक्ष देऊन सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री .बोर्डे....

अशुध्दीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 11:30

ता.प्र.क्र.45122....

प्रा.फौजिया खान.....

वारंवार बैठका झाल्या हे मला मान्य आहे. सभागृहात सुध्दा हा प्रश्न उपस्थित झाल्याचे मला मान्य आहे. वास्तविक पाहता राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन या बाबत निर्णय घेतला जात आहे. या विषयीची फाईल मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केलेली आहे. त्यामध्ये विभागाने जे आश्वासन दिले होते त्या बाबत सहानुभूतीपूर्वकच विचार केलेला आहे. माझे म्हणणे असे आहे की, ही मागणी व्यवहार्य नाही. कदाचित ही मागणी मान्य होण्यासारखी नाही असे वाटते.

श्री.चंद्रकांत पाटील : महोदय, 1995 साली पाचवा वेतन आयोग लागू झाला. तेव्हापासूनचा हा विषय आहे. 1998 मध्ये संपूर्ण महाराष्ट्राला पाचवा वेतन आयोग लागू झाला. माननीय मंत्र्यांनी तेव्हापासून सभागृहाला आश्वासन दिले होते की, ही बाब मला मान्य असून ती मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी पाठवित आहोत. असे असताना आता मंत्री महोदयांना असे का वाटते की, ही मागणी मान्य करता येणार नाही ? मी स्पेसिफिक विचारतो की, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना पाचवा वेतन आयोग देणार आहात की नाही ? माननीय राज्यमंत्र्यांनी शासनाच्या आर्थिक परिस्थितीचा मुद्दा मांडला. मी त्यांना विचारु इच्छितो की, ही मागणी मान्य केल्यानंतर शासनावर किती रकमेचा भार पडणार आहे, तसेच तफावतीची रक्कम जेव्हा देण्यात येईल तेव्हा ती व्याजासह देणार आहात काय ?

प्रा.फौजिया खान : महोदय, मी पुन्हा सांगू इच्छिते की, विभागाकडून सकारात्मक प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. आता ही बाब मंत्रिमंडळाच्या अखत्यारितील आहे. राज्याची आर्थिक परिस्थिती पाहता ही मागणी मान्य करावयाची की नाही हे मंत्रिमंडळाने ठरवायचे आहे. परंतु विभागाने मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सकारात्मक प्रस्ताव सादर केलेला आहे.

श्री.कपिल पाटील : महोदय, माननीय मंत्र्यांनी काय उत्तर द्यावे हा त्यांचा अधिकार आहे हे मला मान्य आहे. सभापती महोदय, माननीय मंत्र्यांकडून अपेक्षित उत्तर मागू शकत नाही असे आपण सांगितले आहे आणि ते सुध्दा मला मान्य आहे. परंतु माननीय मंत्र्यांनी जे उत्तर द्यावयास हवे होते ते त्यांनी आपल्या भाषणाच्या शेवटच्या दोन ओळीत दिले. माननीय मंत्री व राज्यमंत्री महोदय विद्वान आहेत या बद्दल आमच्या मनात शंका नाही. परंतु प्रश्नोत्तराच्या तासात विद्वत्तेपेक्षा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45122....

श्री.कपिल पाटील....

टोकदार उत्तर येणे अपेक्षित आहे. आम्हाला अपेक्षित उत्तर मिळाले नाही आणि आम्ही आमच्या जागेवरुन उठलो तर आम्हाला दोष दिला जातो, हे बरोबर नाही.

महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी दोन्ही सभागृहात निवेदन केले होते. या सभागृहात निवेदन करुन त्यांनी सांगितले की, वेतनश्रेणीतील तफावत तसेच रजेच्या बाबतीत आपल्यावर भार येणार नाही. त्यांनी सभागृहात जे निवेदन केले होते ते खरे आहे काय, नसल्यास त्यांनी केलेले निवेदन मागे घेतले आहे काय ? दुसरी बाब अशी की, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, या विषयी मंत्रिमंडळ निर्णय करणार नाही. मी त्यांना विचारु इच्छितो की, आपण हे उत्तर दुरुस्त करणार आहात काय ? तसेच तिसरी बाब अशी की, माननीय मंत्री महोदयांनी या सार्वभौम सभागृहात तीन मुद्यांवर स्पष्ट शब्दात निर्विवाद आश्वासन दिलेले आहे. त्या आश्वासनांची पूर्तता मंत्रिमंडळामध्ये करुन त्या बाबतची घोषणा या अधिवेशनात करणार काय ?

प्रा.फौजिया खान : महोदय, जे आश्वासन देण्यात आले होते त्यानुसार सकारात्मक पध्दतीचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. मी सभागृहाच्या लक्षात सर्व परिस्थिती आणून दिलेली आहे. किंबहुना ही परिस्थिती सभागृहाच्या लक्षात आणून देणे गरजेचे होते.

श्री.विक्रम काळे : महोदय, आम्हा सर्व शिक्षक आमदारांचे प्रश्न पाठ असतात. प्रश्न आमच्या लक्षात आणून देण्याची गरज काय आहे ? आम्ही एखाद्या प्रश्नाची पार्श्वभूमी सांगितली तर आम्हाला नेमका प्रश्न विचारा असे सांगितले जाते. माननीय मंत्री महोदय स्पेसिफिक उत्तर देण्याऐवजी पार्श्वभूमी सांगत असतील तर त्यांना सुध्दा नेमक्या उत्तरावर बोला असे सांगण्याची वेळ आली आहे. माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांनी गेल्या अधिवेशनात जाहीरपणे लेखी उत्तर दिले होते की, आम्ही दोन महिन्यात या मागण्यांवर निर्णय घेतो. अशा प्रकारचे उत्तर देऊन 9 महिने झाले आहेत. मी स्पेसिफिक विचारतो की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी या बाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल काय ? आम्ही गेल्या आठवड्यात माननीय मंत्र्यांची भेट घेतली. त्यांनी सांगितले की, माननीय मुख्यमंत्र्यांची तारीख घेऊन त्यांच्याकडे बैठक लावण्यात येईल. परंतु अजूनपर्यंत ती बैठक झालेली नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, आपण माननीय मुख्यमंत्र्यांसोबत बैठक आयोजित करणार काय ?

नंतर श्री.कांबळे....

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 45122 ....**

श्री. विक्रम काळे ....

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत 3 महत्त्वाचे प्रश्न आहेत. त्यांचा 16 तारखेला मोर्चा येणार आहे. तो मोर्चा टाळण्यासाठी आपण माननीय मुख्यमंत्र्यांच्या समवेत बैठक लावून या संदर्भातील निर्णय अधिवेशन संपण्यापूर्वी घेणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रश्नांच्या बाबतीत संध्याकाळी माझी माननीय मुख्यमंत्र्यांच्या समवेत चर्चा झाली. त्यांनी सांगितले की, मी ताबडतोब या संदर्भात बैठक घेतो. 1-2 दिवसांत किंवा कदाचित आज सुध्दा ते या संदर्भातील बैठक घेऊ शकतात. आज माननीय मंत्री नव्हते. त्यामुळे आज आम्हीच सांगितले होते की, माननीय मंत्री नाहीत. पण आता माननीय मंत्री आले आहेत. माननीय मंत्री आल्यानंतर बैठक घ्यावी, असे त्यांनी सांगितले. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या संदर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी बैठक घेण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आम्हाला आपल्याकडून मार्गदर्शन पाहिजे. बऱ्याच प्रश्नांवर माननीय मंत्री असे सांगतात की, आम्ही फाईल अर्थ खात्याकडे पाठविली आहे किंवा मंत्रिमंडळाकडे पाठविली आहे. तो आमचा विषय नाही. सरकारचा निर्णय झाला की नाही ? ही टोलवाटोलवी चालली आहे. मघाशी म्हटले की, उत्तर काय द्यावे हा त्यांचा प्रश्न आहे. आपण ही पध्दत आता बंद करा. अशाच पध्दतीने टोलवाटोलवी करीत असाल तर ते ठीक नाही. आमच्या खात्याकडून फाईल गेलेली आहे असे सांगता म्हणजे उपकार करता काय ? निर्णय झाला की नाही, हे उत्तर पाहिजे. सरकार म्हणून एकच आहेत. पण उत्तर देत नाहीत. ही आघाडी सरकारची अडचण आहे का ? असे असेल तर तसे सांगा. आपण सांगा की, आमचा प्रॉब्लेम आहे. आम्ही केले आहे, पण त्या खात्याचे माननीय मंत्री करीत नाहीत. असे नसावे. मी प्रश्न विचारीत नाही. बऱ्याच प्रश्नांवर उत्तर येते की, आम्ही फाईल पाठविली आहे. माझी विनंती आहे की, माननीय मंत्र्यांची सही असो, मंत्रिमंडळाची सही असो, काहीही असो, टोटल इंटिग्रल निर्णय झाला की नाही, हे सांगितले पाहिजे. अशा पध्दतीने टोलवाटोलवी करणे बरोबर नाही.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**ता.प्र.क्र. 45122 ....**</u>

श्री. जयंत प्र. पाटील : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मूलभूत प्रश्न उपस्थित केला आहे. शिक्षण खात्याला, बांधकाम खात्याला किती पैसे असतील या संदर्भात बजेटमध्ये तरतूद केली आहे. आता त्यामध्ये त्यांनी बसवायचे आहे. यामध्ये अर्थ खात्याचा संबंध येत नाही. अर्थ खात्याकडे फाईल गेली, असे सांगतात. मार्चच्या बजेटमध्ये आम्ही तरतूद करून दिलेली आहे. त्यामध्ये बसणार की नाही, तेवढे सांगावे किंवा आमची तरतूद संपलेली आहे, नवीन तरतुदीसाठी मंत्रिमंडळापुढे जात आहोत, असे तरी उत्तर द्यावे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी भावना व्यक्त केली. माननीय मंत्री त्यांच्या विभागाने किती प्रयत्न केला, हे सभागृहाला समजावून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. काही वेळा फाईल अर्थ खात्याकडे सादर केली आहे किंवा मंत्रिमंडळाकडे सादर केली आहे, असे सांगितले जाते. ॲक्शन पूर्ण झाल्यानंतर, अर्थ विभागाने मंजुरी दिल्यानंतर, मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर पूर्ण होत असते. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांची अपेक्षा एवढीच आहे की, उत्तर पूर्ण होईल, असे उत्तर दिले पाहिजे. आपल्या दृष्टीने ते सोयीचे आहे आणि एकंदरीत सभागृहाच्या दृष्टीनेही ते योग्य होईल, असे मला वाटते.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, विरोधी पक्षनेत्यांनी व्यक्त केलेल्या भावनेशी आम्ही सहमत आहोत. प्रत्येक प्रश्नाला उत्तर देताना प्रक्रिया सुरू आहे, एवढेच उत्तर आम्हाला द्यावे लागेल. भावना अशी आहे की, वारंवार जे प्रश्न विचारले जातात, त्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभाग खूप प्रयत्न करीत असतो. अनेकदा फाईलवर निगेटिव्ह अभिप्राय आल्यावर सुध्दा विभाग वारंवार प्रयत्न करतो. हे सांगण्याचा प्रयत्न होत होता. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या मताशी मी सहमत आहे. शासन म्हणून आम्ही एक आहोत. आम्ही निर्णय झाला, झाला नाही, प्रक्रिया सुरू आहे एवढेच सांगितले तर तितक्याने समाधान होणार नाही, म्हणून सर्व सांगणे अत्यंत आवश्यक आहे.

----

( नंतर श्री. खंदारे ....

अस्सुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**राज्यात आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या विद्यार्थ्यांना फी माफीसाठी रुपये 5,00,000/- लाखाची उत्पन्न मर्यादा ठेवण्याबाबत**

**(4) * 45435 श्री.सतीश चव्हाण , श्री.जयवंतराव जाधव , श्री.राणा जगजितसिंह पाटील , श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी , श्री.विक्रम काळे , श्री.एम.एम.शेख , श्री.अमरसिंह पंडित , श्री.अरुण जगताप** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या विद्यार्थ्यांना फी माफीसाठी रुपये 5,00,000/- लाखाची उत्पन्न मर्यादा ठेवण्यास शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना फी माफी योजनेसहीत सर्व शैक्षणिक सवलतीच्या योजनांचा आढावा घेण्यात येत असून याअंतर्गत अंतिम निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, मी विचारलेल्या पहिल्या लेखी प्रश्नाला मंत्री महोदयांनी " हे खरे नाही " असे उत्तर दिलेले आहे. परंतु मागील अधिवेशनामध्ये सन्माननीय उच्च शिक्षण मंत्री श्री.राजेश टोपे यांनी लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना असे म्हटले होते की, "माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची उपसमिती नेमली आहे. ती समिती या विषयावर विचार करीत असून या समितीचा अहवाल सादर झाल्यावर मंत्रिमंडळ अंतिम निर्णय घेणार आहे." त्यावेळी माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांनी उत्तर दिले होते. माझ्याजवळ त्यावेळचे इतिवृत्त आहे. आता माननीय शालेय शिक्षण मंत्री उत्तर देत आहेत. परंतु आजही माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांनी उत्तर द्यावे. आज माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी "हे खरे नाही" असे उत्तर दिले ते खरे आहे की, तेव्हा माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांनी दिलेले उत्तर खरे आहे ?

**सभापती** : विधानमंडळाकडून शालेय शिक्षण विभागाकडे हा प्रश्न गेला असल्यामुळे त्या विभागाचे मंत्री महोदयच या प्रश्नाला उत्तर देतील. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारताना मागील अधिवेशनातील लक्षवेधी सूचनेचा संदर्भ देऊनच हा प्रश्न उपस्थित करणे आवश्यक होते.

श्री.सतीश चव्हाण : त्यावेळी सन्माननीय उच्च शिक्षण मंत्री श्री.राजेश टोपे यांनी सविस्तरपणे निवेदन केले होते.

**सभापती** : हा विषय शालेय शिक्षण विभागाकडे गेला असेल तर त्या विभागानेच उत्तर देणे योग्य होईल.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

ता.प्र.क्र.45435........

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मागील वेळी लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती. त्यावेळी शिक्षण विभागाच्या अनुषंगाने मी उत्तर दिले होते. हा विषय शालेय शिक्षण विभाग व उच्च शिक्षण विभागाशी संबंधित असला तरी यामध्ये विषय इतकाच आहे की, जे विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकात मोडतात त्यांच्यासाठी आर्थिक मर्यादा 15 हजार रुपयांची होती ती आता शासनाने 1 लाख रुपये केलेली आहे. केंद्र सरकारने आता क्रिमीलेअर व नॉन-क्रिमीलेअरसाठी 6 लाख रुपयांची मर्यादा केलेली आहे. त्याप्रमाणे एससी, एसटी, ओबीसीच्या विद्यार्थ्यांसाठी सुध्दा 6 लाख रुपयांची मर्यादा करावी व ईबीसीसाठी 5 लाख रुपयांची मर्यादा करावी अशा प्रकारचा प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव प्रक्रियेमध्ये आहे. मंत्रिमंडळाला सादर करण्याची फाईल तयार आहे, फाईल पॉझि ाटिव्ह आहे. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांसाठी 5 लाख रुपयांची आर्थिक मर्यादा करण्याच्या दृष्टीकोनातून सर्व विभागांची मान्यता घेऊन मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी फाईल तयार आहे. माननीय मुख्यमंत्री मंत्रिमंडळाच्या ज्या बैठकीत हा विषय घेतील त्या बैठकीत चर्चेअंती योग्य तो निर्णय निश्चितपणे घेण्यात येईल.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा विषय विविध विभागांशी संबंधित आहे. शालेय शिक्षण विभागाकडून मात्र अशी मर्यादा ठरविण्यात आलेली नाही. शालेय शिक्षण विभागाच्या ज्या योजना आहेत त्यासंबंधी विभागाने आढावा घेतलेला आहे. एससी, एसटी, ओबीसी व ईबीसीच्या इयत्ता 10 वी पर्यंतच्या सर्व मुलामुलींसाठी शिक्षण मोफत आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत एससी, एसटी, ईबीसीच्या इयत्ता 12 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षण दिले जाते. आता प्रस्ताव असा आहे की, सर्व मुलामुलींसाठी शिक्षण मोफत करावे. तसेच ज्या योजना कालबाह्य झालेल्या आहेत त्या बंद कराव्या.

नंतर श्री.शिगम.......

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 11:45

ता.प्र.क्र. 45435.... प्रा. फौजिया खान...

त्या योजनांऐवजी सर्वांना 12वी पर्यंत मोफत शिक्षण द्यावे असा आमचा निर्णय झाला तर या ईबीसीच्या अटीची गरज राहाणार नाही. म्हणून शालेय शिक्षण विभागाला ईबीसीच्या मर्यादेची बाब लागू होत नाही. ज्या विभागाला ती लागू होते त्या विभागाने त्याबाबतीत मर्यादा ठरवावी.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**दारव्हा (जि.यवतमाळ) तालुक्यातील मातीचे ढाळीबांध टाकण्याच्या कामात केलेला गैरव्यवहार**

**(५) * ४६९८२ श्री.संदिप बाजोरिया** : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारव्हा (जि.यवतमाळ) तालुक्यातील अनेक गावात मेघा पाणलोटची कामे सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मातीचे ढाळीबांध टाकण्याचे काम जेसीबी किंवा पोकलँड मशिनद्वारे करण्याचे शासनाचे आदेश असताना हे काम ट्रक्टरद्वारे करुन यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुरेश धस, डॉ.नितीन राऊत यांच्याकरिता :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. या पाणलोटांतर्गत मातीचे ढाळीबांध टाकण्याचे काम जेसीबी किंवा पोकलँड मशिनद्वारे करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संदीप बाजोरिया : हा अत्यंत महत्वाचा प्रश्न असून छापील उत्तरामध्ये "हे खरे नाही" असे म्हटलेले आहे. मी सांगू इच्छितो की, या खात्याचे माननीय मंत्री महोदय हे आमच्या जिल्ह्याचे पालक मंत्री आहेत. यवतमाळ जिल्ह्यामध्ये ११७ कोटी रुपयाची पाणलोटाची कामे सुरु आहेत. दारव्हा तालुक्यातील नेर धरणाची ९१ कामे चालू आहेत. त्यापैकी ८५ कामे एकाच व्यक्तीला दिलेली आहेत. ज्या ठिकाणी कामे चालू आहेत त्या ठिकाणची पाहणी मी केलेली आहे. ५७ ठिकाणी बंधारे नसताना त्या बंधाऱ्यांचे पेमेंट झालेले आहे. काही ठिकाणी अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम झालेले आहे. हे प्रकरण उघडकीस येत असताना कायदा आणि सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. हे प्रकरण जर उघडकीस आणले तर जीवे मारले जाईल अशा प्रकारची धमकी मला प्रायव्हेट फोनवरुन देण्यात आलेली आहे. मांगला देवी, करोडी खोपडी, डोलारी देवी येथे बंधारे नाहीत. पण त्या बंधाऱ्यांचे पेमेंट झालेले आहे. अशा प्रकारे चुकीचे पेमेंट करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल काय,तसेच ज्या व्यक्तीने प्रायव्हेट फोनवरुन जीवे मारण्याची धमकी दिली त्याचा शोध घेऊन त्याचे नाव या सभागृहाला अवगत करण्यात येईल काय ?

..३..



MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 11:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश धस : सन्माननीय सदस्यांनी मातीचे ढाळीबांध टाकण्यासंबंधी प्रश्न विचारलेला आहे. हे ढाळीबांधाचे काम जेसीबी किंवा पोकलँड मशिनद्वारे करण्यात आलेले आहे काय, असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. या प्रश्नाला "पाणलोटांतर्गत मातीचे ढाळीबांध टाकण्याचे काम जेसीबी किंवा पोकलँड मशिनद्वारे करण्यात आले आहे" अशा प्रकारे उत्तर देण्यात आलेले आहे. पोकलँड मशिनच्या मालकाचे नाव भिसे आहे. शासन निर्णयानुसार वृत्तपत्रामध्ये निविदा प्रसिध्द करुन ज्याची निविदा लोएस्ट आली त्याच्याशी ॲग्रीमेंट करण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी ज्या बंधाऱ्यांचा उल्लेख केला त्याबाबत त्यांच्याकडे असलेले पुरावे त्यांनी सादर केले तर त्याबाबतीत शासन निश्चितपणे विचार करील.

श्री. राम पंडागळे : सन्माननीय सदस्यांना फोनद्वारे जीवे मारण्याची धमकी दिली ही बाब अतिशय गंभीर आहे. सन्माननीय सदस्यांनी न झालेल्या बंधाऱ्यांचे पेमेंट झालेले आहे असे सांगितलेले आहे. तेव्हा या बाबतीत मंत्री महोदय सभागृहासमोर खुलासा करतील काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46982....

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, त्या ठिकाणी बंधारे बांधण्यात आलेले नाहीत अशा प्रकारचे सन्माननीय सदस्यांचे मत आहे. त्यांचे मत या प्रश्नाला सोडून आहे. रेवडी व इतर गावांचा त्यांनी उल्लेख केलेला आहे, त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी स्फेसिफिक माहिती दिली तर त्याबाबतची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल. महोदय, धमकी विषयी देखील सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे, त्या विषयाचा या प्रश्नाशी काहीही संबंध नाही. त्यामुळे कोणी कोणाला धमकी दिली या बाबतची माहिती मी या ठिकाणी देऊ शकत नाही. त्यांना कोणी धमकी दिली असेल तर त्यांनी रीतसर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करावी.

श्री.किरण पावसकर : महोदय, सन्माननीय सदस्य म्हणत आहेत की, त्या ठिकाणी बंधारेच नाहीत. मला वाटते की, धमकीचा प्रश्न थोडा बाजूला ठेवावा. या ठिकाणी मातीचे ढाळीबांध टाकण्याचे काम करताना जेसीबी, पोकलँड मशिनचा वापर करण्यात आला. ही कामे जेसीबी, पोकलँड मशिनने करावे असे शासनाचे आदेश आहेत अशीही सन्माननीय सदस्यांनी प्रश्नात माहिती दिलेली आहे. जर या ठिकाणी ढाळीबांधाचे काम केले गेले नसेल तर कशासाठी जेसीबी आणि पोकलँड मशीन्स घेऊन गेलेत, याबाबतची माहिती देण्याची वेळ सभागृहातील एका सन्माननीय सदस्यांवर का यावी, सदस्यांकडून माहिती घेण्यापेक्षा तेथे खरोखरच बंधारे बांधले गेले आहेत की नाही, या गोष्टीचा शासनाने पाठपुरावा करण्यास काय हरकत आहे ?

श्री.सुरेश धस : महोदय, ढाळीबांध टाकण्याचे काम हा वेगळा विषय आहे आणि बंधारे हा वेगळा विषय आहे.मातीचा ढाळीबांध टाकण्याबद्दलचा प्रश्न विचारला आहे, त्या अनुषंगाने उत्तर देण्यात आले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तीन गावात बंधारे झालेले नाहीत अशा प्रकारची माहिती दिली आहे. तर त्या बाबतची सन्माननीय सदस्यांनी शासनाकडे रीतसर तक्रार करावी, त्या तक्रारीची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक तक्रार केली तर त्यांच्या तक्रारीची चौकशी करण्यात येईल अशी माहिती मी मघाशीच सांगितली आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांकडे या प्रश्नाव्यतिरिक्त अन्य माहिती उपलब्ध आहे. ती माहिती ते सभागृहात देण्याचा प्रयत्न करीत आहेत. सन्माननीय सदस्यांनी ती माहिती माननीय मंत्री महोदयांकडे दिली तर ते त्या माहितीची पूर्ण चौकशी विभागामार्फत करतील. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याकडे असलेली माहिती माननीय मंत्री महोदयांकडे सादर करावी.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संदीप बाजोरिया : या ठिकाणी एकाच माणसाकडे 85 कामे आहेत. ज्यावेळी हे प्रकरण उघडकीस आले, त्यावेळी एका पत्रकाराला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यासंबंधी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार सुध्दा करण्यात आली आहे. तक्रारीच्या वेळी खाजगी दूरध्वनी आला होता, तो कोणाचा होता, एवढी प्रभावशाली व्यक्ती कोण आहे,दूरध्वनी करणारा एखादा लोकप्रतिनिधी आहे काय, त्या व्यक्तीचे नाव सभागृहाला कळेल काय, ही कामे कोणा व्यक्तीकडे आहेत, डोलारीदेवी, करोड, खोकडी, ब्रम्हनंद या ठिकाणी बंधाऱ्यांची कामे झाली नाहीत, त्या बाबतीत चौकशी केली जाईल काय ? त्या ठिकाणच्या कामांमध्ये काही त्रुटी आढळून आल्या तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल काय ?

डॉ.नितीन राऊत : या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी धमकीच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांनी पोलीस स्टेशनला तक्रार केली असेल तर त्यासंबंधी माननीय गृहमंत्र्यांची भेट घेऊन सदर तक्रारीच्या चौकशी संबंधीची विचारणा करण्यात येईल. विधिमंडळाच्या एखाद्या सदस्याला कोणी धमकी देत असेल तर ती गंभीर बाब आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांना धमकी दिली नसून एका पत्रकाराला धमकी देण्यात आली आहे.

डॉ.नितीन राऊत : सन्माननीय सदस्यांना धमकी दिली नसेल तर प्रश्न उपस्थित होत नाही. सन्माननीय सदस्यांनी बंधाऱ्यांच्या बाबतीत माहिती दिली आहे, त्या माहितीची आम्ही नोंद घेतो आणि त्या अनुषंगाने चौकशी केली जाईल.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील पायाभूतपेक्षा**

**वाढीव पदांच्या मंजूरीबाबत**

**(६) * ४६२४२ श्री.रामनाथ मोते , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो गाणार :**

सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक विभागातील गेल्या १० वर्षांतील पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्याबाबत प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) उच्च माध्यमिक विभागातील पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्याबाबतचे किती वर्षांचे व केव्हाचे प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहेत,

(३) वाढीव पदांना प्रशासकीय मान्यता/मंजूरी न देण्याची कारणे काय आहेत,

(४) याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी दिलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली आहे ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता :** (१) होय हे खरे आहे.

(२) सन २००३-०४, २००५-०६, २००६-०७, २००७-०८, २००८-०९, २००९-१० व सन २०१०-११ या ७ वर्षांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

(३) व (४) वित्त विभागामार्फत उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

श्री.रामनाथ मोते : आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील पहिल्या क्रमांकाचा प्रश्न माध्यमिक शाळांमधील वाढीव पदासंदर्भातील होता. परंतु हा प्रश्न उच्च माध्यमिक शाळांमधील वाढीव पदांचा आहे. दिनांक २२ जुलै, २०१३ रोजी यासंदर्भातील तारांकित प्रश्न उपस्थित झाला होता. त्यावेळी या प्रश्नाला सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. मी त्यावेळी अतिशय मूलभूत प्रश्न विचारला होता. दिनांक २६ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयानुसार डिसेंबर २००१ पासून पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्याचे धोरण मान्य करण्यात आले. हे धोरण मान्य करीत असताना राज्य हे युनीट धरावे. मुळात आज राज्याची स्थिती काय आहे, खरोखरच १०० टक्के अनुदानावरची वाढीव पदे कार्यरत आहेत काय, या गोष्टींचा आढावा घेण्याचे आपण मान्य केले होते. या निमित्ताने माझा पहिला प्रश्न आहे की, अशा प्रकारचा आढावा शासनाने घेतला आहे काय, असल्यास, त्या संदर्भात काय निर्णय घेतला आहे ?

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ D/ MMP/ KTG/ 11:55

ता.प्र.क्र.46242..... श्री.रामनाथ मोते.....

गेल्या 6-7 वर्षातील उच्च माध्यमिकच्या 1500 पेक्षा अधिक वाढीव पदांबाबत न्यायालयीन प्रकरण झाले आहे का? न्यायालयाने या वाढीव पदांना मान्यता देण्याबाबत काही निर्देश दिले आहेत का? गेल्या 5-6 वर्षापासून पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदांचा प्रश्न उग्र बनलेला आहे. या संदर्भात कार्यवाही सुरु आहे असे म्हटले आहे. या शिक्षकांना न्याय देण्याच्या भूमिकेतून आणि हा प्रश्न पुन्हा विचारावा लागणार नाही या दृष्टीने हा प्रश्न लवकरात लवकर निकाली काढण्यात येईल का?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, उच्च माध्यमिक शिक्षकांच्या 2003 ते 2008 पर्यंतचा वाढीव पदांचा प्रश्न निकाली काढलेला आहे. त्यात 98 पदे राहिलेली होती. 2003 ते 2011 पर्यंत 98 + 1014 असा एकूण 1112 वाढीव पदांचा हा प्रश्न आहे. या पदांसाठीचा प्रस्ताव उच्च स्तरीय समितीकडे सादर झाला आहे. माध्यमिक शाळांच्या शिक्षकांच्या पदांबाबत ज्या काही त्रुटी काढण्यात आल्या त्याच पध्दतीच्या त्रुटी उच्च माध्यमिक शिक्षकांच्या वाढीव पदांबाबत काढलेल्या आहेत. त्या त्रुटींची पूर्तता करुन पाठविलेली आहे. या शिवाय गणित आणि संख्याशास्त्र या विषयासाठी 103 वाढीव पदांचा प्रश्न आहे. हा प्रस्ताव संयुक्त सचिव समितीकडे पाठविण्यात आला आहे. हे सर्व विषय प्रक्रियेत आहेत. हे विषय लवकरात लवकर मार्गी लागावेत हीच आमची भूमिका आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्य हे युनिट धरुन आढावा घेण्याबाबत शासनाने मान्य केले होते, त्यानुसार आढावा घेण्यात आला का? पायाभूत वाढीव पदांना मान्यता देण्याबाबत न्यायालयाने शासनाला काही निर्देश दिले होते, ते निर्देश काय आहेत?

प्रा.फौजिया खान : न्यायालयाच्या निर्देशाची आमच्यापर्यंत माहिती आलेली नाही.

श्री.रामनाथ मोते : शासनाला टाईम लिमिट निर्देश दिले आहेत.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, न्यायालयीन प्रक्रियेची माहिती घेण्यात येईल. ती माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे काही झाले असेल तर तशी माहिती घेऊन त्या अनुषंगाने त्यावर विचार केला जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46242.....

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, माध्यमिक व प्राथमिक शाळांमध्ये पायाभूत पदे म्हणजे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचा समावेश होतो. या दोन्ही माध्यमांच्या शाळांबाबत शासनाने दिनांक 20 नोव्हेंबर, 2013 रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. या शासन निर्णयानुसार तुकड्यामधील विद्यार्थी संख्येमध्ये बदल केला गेला आहे. या निर्णयाचा या शाळांवर भविष्यात विपरित परिणाम होणार आहे. या निर्णयाबाबत शासन पुनर्विचार करणार आहे का?

प्रा.फौजिया खान : तो प्रश्न या प्रश्नाच्या कार्यकक्षेत येत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शिक्षक प्रतिनिधींनी वारंवार न्यायालयात धाव घेऊन निर्णय प्राप्त करुन घेतल्यानंतरच त्या अनुषंगाने शासन निर्णय घेणार आहे का? न्यायालयाने दिलेल्या आदेशाची माहिती अधिकारी वर्गाकडून मंत्री महोदयांला दिली जात नसेल तर त्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली जाईल? 2008-09 ते 2013-14 पर्यंतच्या वाढीव पदांना हे अधिवेशन संपण्यापूर्वी मान्यता दिली जाईल का?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने सांगू इच्छिते की, 2011-12 या शैक्षणिक वर्षासाठी सुध्दा 298 उच्च माध्यमिक शिक्षकांच्या वाढीव पदांचा प्रस्ताव शिक्षण संचालकांनी शासनाला सादर केला आहे. तथापि संपूर्ण विभागाचा एकत्रित प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी शिक्षण संचालकांना शासनाने कळविले आहे. त्या पध्दतीचा प्रस्ताव शासनाकडे येणार असून त्याची प्रक्रिया सुरु आहे. निश्चितपणे त्या त्या वर्षासाठीचे प्रस्ताव मागवून त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

नंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.46242...

प्रा.फौजिया खान....

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सभागृहाला सांगू इच्छिते की, पुढच्या अधिवेशना पर्यंत हा विषय निकाली काढण्याची दक्षता घेण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी पुढील अधिवेशना पर्यंत प्रश्न निकाली काढण्यात येईल अशा प्रकारचे उत्तर दिलेले असले तरी त्यावर विश्वास ठेवता येत नाही. याचे कारण असे की, मागच्या अधिवेशनातील काही प्रश्नांसंबंधातील दिलेल्या उत्तराप्रमाणे अद्यापि कार्यवाही पूर्ण झालेली नाही. माझा प्रश्न असा आहे की, उच्च माध्यमिक शाळांमधील बंद पडलेल्या तुकड्या व बंद पडलेले विषय यामुळे रिक्त झालेल्या जागांचा आढावा घेण्यात आला आहे काय ? यासाठी वित्त विभागाकडे न जाता आपण वाढीव पदांचे समायोजन करावे. तेव्हा शासनाने असा काही आढावा घेतला आहे काय, तपासणी केली आहे काय व त्या नुसार निर्णय घेण्यात येणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे त्यावर विचार करण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभापती तालिका नामनिर्देशित करणे

**सभापती** : मी महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 8 (1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

1. श्री.मोहन जोशी
2. श्री.रमेश शेंडगे
3. श्री.नागो पुंडलिक गाणार
4. ॲड.अनिल परब

.........

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अध्यादेश सभागृहा समोर ठेवणे.

श्री.राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2013 चा अध्यादेश क्रमांक 15 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, 2013 मी आपल्या अनुमतीने सभागृहा समोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

.....

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2013 चा अध्यादेश क्रमांक 16 - महाराष्ट्र आकस्मिकता निधी (तिसरी सुधारणा) अध्यादेश, 2013 मी आपल्या अनुमतीने सभागृहा समोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

.....

श्री.संजय सावकारे (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2013 चा अध्यादेश क्रमांक 14 - महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अध्यादेश, 2013 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

.....

श्री.संजय सावकारे (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय,सन 2013 चा अध्यादेश क्रमांक 17 - महाराष्ट्र कृषी विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, 2013 मी आपल्या अनुमतीने सभागृहा समोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

.......

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2013-2014 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे.

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013-2014 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2013-2014 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**सभापती** : सन 2013-2014 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे.

.......

...5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2006-2007 व 2007-2008 करिता खर्चाचे अतिरिक्त विवरणपत्र सादर करणे.

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006-2007 व 2007-2008 करिता खर्चाचे अतिरक्त विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2006-2007 व 2007-2008 च्या खर्चाच्या अतिरिक्त विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**सभापती** : सन 2006-2007 व 2007-2008 मधील खर्चाचे अतिरिक्त विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे.

.......

...6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधेयकांना संमती व अधिसंमती

**सभापती** : दोन्ही सभागृहाद्वारे पारित केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती व राज्यपाल यांची अधिसंमती मिळाल्याची यादी अतिरिक्त सचिव वाचून दाखवतील.

अतिरिक्त सचिव : राष्ट्रपतींनी पुढील विधेयकाला अधिसंमती दिली आहे :-

सन 2011 चे विधान सभा विधेयक क्रमांक 47 - मुंबई दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक, 2011.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अतिरिक्त सचिव .....

खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली आहे.

(1) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 9- महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, 2013.

(2) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 20- महाराष्ट्र कृषि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2013.

(3) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 21- महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2013.

(4) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 22- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, 2013.

(5) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 26- महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, 2013.

(6) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 27- महाराष्ट्र कृषि,पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, 2013.

(7) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 28- महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, 2013.

(8) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 29 - महाराष्ट्र देवदासी प्रथा (नाहीशी करणे) (सुधारणा) विधेयक, 2013

(9) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 30- महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ विधेयक, 2013.

(10) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 32- महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (सुधारणा) विधेयक, 2013.

(11) सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 2- महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, 2013.

(12) सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 7- महाराष्ट्र पशुधन सुधारणा (सुधारणा) विधेयक, 2013.

(13) सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 8- महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, 2013.

----------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>सावकारी विधेयकाबाबत</u>

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय राष्ट्रपती महोदयांनी तसेच माननीय राज्यपाल महोदयांनी कोणकोणत्या विधेयकांना अधिसंमती दिली आहे याची यादी सभागृहासमोर वाचून दाखविण्यात आली आहे. महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांच्या संदर्भातील सावकारी विधेयक गेल्या चार वर्षापासून माननीय राष्ट्रपती महोदयांकडे पेन्डींग असून त्यावर माननीय राष्ट्रपती महोदयांनी सही केलेली नाही. या विधेयकाच्या संदर्भात वारंवार क्वेरीज काढल्या जातात. महाराष्ट्र शासनाकडे या विधेयकाच्या संदर्भात कोणकोणत्या क्वेरीज पाठवते याची माहिती आम्हाला अद्याप पर्यंत मिळालेली नाही. गेल्या 4/5 वर्षापासून माननीय राष्ट्रपती महोदयांनी सावकारी विधेयकावर सही केलेली नाही. या विधेयकाला माननीय राष्ट्रपती महोदयांची मान्यता का मिळत नाही याची माहिती सदनाला मिळण्याची आवश्यकता आहे. सावकारी विधेयकाच्या संदर्भात महाराष्ट्रातील शेतकरी आतुरतेने वाट पाहत आहे. त्यामुळे सावकारी विधेयकाच्या संदर्भात शासनाकडून खुलासा होण्याच्या दृष्टीने आपण राज्य शासनाला निर्देश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, सावकारी विधेयक दोन्ही सदनाने मंजूर करुन माननीय राष्ट्रपती महोदयाच्या मंजुरीसाठी पाठविलेले आहे. गेल्या अनेक वर्षापासून या विधेयकावर माननीय राष्ट्रपती महोदयांनी सही केलेली नाही. हे विधेयक तातडीने मंजूर व्हावे अशी सदनाची भावना आहे, त्यामुळे यासंदर्भात आपण संबंधित मंत्र्यांचे लक्ष वेधून या बाबतीत एक निवेदन या सभागृहात करण्यास सांगावे.

श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान ( वस्त्रोद्योग मंत्री ) : ठीक आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सावकारी विधेयकाच्या संदर्भात गेल्या अधिवेशनात आपण एक बैठक घेतली होती. माझ्या माहिती प्रमाणे या विधेयकात बऱ्याच चुका असल्यामुळे हे विधेयक केंद्राने आपल्याकडे परत पाठविले आहे. आता हे विधेयक दुरुस्त करुन पाठवले जाणार आहे की, नव्याने हे विधेयक आणले जाणार आहे ? नव्याने विधेयक आणले जाणार असेल तर त्यासंदर्भात अध्यादेश काढला जाणार आहे काय ? या शासनाने इंडिया बूल्सला पाणी देण्यासाठी त्वरित अध्यादेश काढला. परंतु हे शासन शेतकऱ्यांसाठी अध्यादेश का काढत नाही असा प्रश्न जनतेच्या मनात पडला आहे. त्यामुळे सावकारी विधेयक येईपर्यंत सावकारी विधेयकाच्या संदर्भात अध्यादेश काढला जाणार आहे काय याची माहिती शासनाने देण्याची आवश्यकता आहे.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान : सभापती महोदय, आपण केलेल्या सूचनेनुसार संबंधित मंत्री महोदयांच्या निदर्शनास ही बाब आणून देण्यात येईल.

------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : आज माझ्याकडे आठ नियम 93 अन्वयेच्या प्राप्त झालेल्या सूचनांच्या त्यासंदर्भातील माझे निर्णय अतिरिक्त सचिव वाचून दाखवतील.

अतिरिक्त सचिव : सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिशन बाजोरिया यांनी "अकोला महानगरपालिकेला शासनाने 28 कोटी रुपये विशेष निधी आयोगातील रक्कम देणे दीर्घ काळापासून थकीत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे यांनी "शालेय शिक्षण विभागाचा दिनांक 23 ऑक्टोबर, 2013 चा शासन निर्णय मागे घेण्यात यावा यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने दि.10 डिसेंबर, 2013 रोजी नागपूर येथे विधानभवनासमोर धरणे आंदोलन आयोजित केले असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "दिनांक 18/9/2003 आणि 12/6/2009 रोजी राज्यात चित्रकला, हस्तकला आणि कलांचे विषय शिकविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक नियुक्त करण्याबाबत अध्यादेश काढणे, हे विषय शिकविण्यासाठी पुरेसे शिक्षक उपलब्ध असतांनाही एकाचीही नियुक्ती करण्यात न येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकात पाटील, नागो गाणार, रामनाथ मोते यांनी "शालेय शिक्षण विभागाच्या प्राथमिक संचालनालयातर्फे तसेच सर्व शिक्षण अभियानांतर्गत राज्यातील इ. 1 ली ते 8 च्या विद्यार्थ्यांसाठी पुरविलेल्या शालेय साहित्य वाटपात झालेला भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अतिरिक्त सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, भाई गिरकर यांनी "मौजे आंबिवली, ता.अंधेरी येथील स.क्र.111 डी मधील भूखंड क्रमांक 15 व 16 प्रगती सहकारी गृहनिर्माण संस्थेने या जागेवर रितसर परवानगी घेऊन बांधकाम सुरु केले असता या भूखंडावर शाळेचे आरक्षण टाकून हे बांधकाम बंद करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "राज्याचे ॲडव्होकेट जनरल यांनी स्पष्ट अभिप्राय व शिफारस देऊनही राज्यातील 9 हजार वसतिशाळा शिक्षकांना रिक्त पदांवर नियमित करण्यात शासनाकडून होणाऱ्या दिरंगाईमुळे राज्यातील 22 वसतिशाळा शिक्षकांनी केलेल्या आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, 22 वसतिशाळांतील शिक्षकांनी आत्महत्या केलेल्या आहेत. हा विषय महत्वाचा आणि गंभीर आहे. या विषयाची तातडीने दखल घेण्याची आवश्यकता आहे. नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पटलावर ठेवण्यात येतात. या प्रश्नाच्या संदर्भात ॲडव्होकेट जनरल यांनी सकारात्मक शिफारस केलेली आहे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. असे असताना हा प्रश्न सोडविण्यामध्ये शासन दिरंगाई करीत आहे. शालेय शिक्षण विभागाने आपले काम केलेले आहे. परंतु वित्त आणि नियोजन विभागाकडे फाईल पडून आहे. या ठिकाणी कोणतीही नवीन पदे भरण्याची आवश्यकता नाही. राज्याला कोणतीही आर्थिक तरतूद करण्याची गरज नाही. असे असताना शासनाने या संदर्भात अजून निर्णय घेतलेला नाही. खेड्यापाड्यातील आणि डोंगरदऱ्यातील ही मुले आहेत. त्यांनी त्या भागातील शिक्षण सांभाळले आहे. तेव्हा माझी विनंती आहे की, या विषयावरील निवेदन याच आठवड्यात होणे आवश्यक आहे आणि तसे आपण माननीय मंत्री महोदयांना निदेश द्यावेत.

**सभापती** : या प्रश्नाचे लवकर उत्तर येईल असे माननीय मंत्री महोदयांनी पहावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी देखील नियम 93 ची सूचना दिली होती.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आज एकूण सहा सूचना मान्य करण्यात आल्या. या सूचनांव्यतिरिक्त आपली सूचना असेल तर ती मी पाहून घेतो. आपण दिलेल्या 93 च्या सूचनेतील विषय मान्य करण्यासारखा असेल तर तो मी जरुन घेईन.परंतु आपण दिलेला विषय मान्य करण्यासारखा नसेल तर मी आपली सूचना अमान्य केली आहे असे समजावे.

मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या नियम 93 अन्वयेच्या सर्वच सूचना मी मान्य करीत नाही. पहिल्या दिवशी एकूण 8 सूचना प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी सहा सूचना स्वीकारण्यात आल्या. जर उद्या 40 सूचना आल्या आणि त्या सर्व सूचना घ्यायचे ठरविले तर अडचण होईल. आपण महत्वाच्या विषयांना प्राधान्य देतो.

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत</u>**

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये दोन प्रस्तावाच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यातील पहिला प्रस्ताव हा सर्वश्री विनोद तावडे, रामदास कदम, पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्री.जयंत प्र.पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, श्री.भाई गिरकर, ॲड.अनिल परब, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार आणि विनायक राऊत यांचा आहे. "विदर्भ आणि कोकणात माहे जून आणि जुलै महिन्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे विदर्भ आणि कोकणातील शेतकऱ्यांच्या वैयक्तिक विहिरीसह रस्ते, पाटबंधारे प्रकल्प, ट्रान्सफॉर्मस इत्यादी सार्वजनिक मालमत्तेचे हजारो कोटीचे झ ाालेले नुकसान" असा त्या प्रस्तावाच्या सूचनेचा विषय आहे.

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्यावर आज चर्चा न करता त्या संदर्भात मी उद्या निर्णय देणार आहे.

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे तो विषय नियम 289 चा कसा होतो या बाबत त्यांनी थोडक्यात आपले मत मांडावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मागील पावसाळी अधिवेशन सुरु असताना दिनांक 18 जुलै, 2013 रोजी विदर्भात आणि कोकणातील काही भागांत मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली. त्या अतिवृष्टीमध्ये मोठ्या प्रमाणावर वित्तहानी आणि मनुष्यहानी झाली होती. तेव्हा आम्ही तातडीने ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी केली होती. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे असा आम्ही आग्रह धरला होता. तेव्हा माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, मी तेथील दौरा करुन आल्यानंतर त्या संदर्भातील माहिती देतो. आम्ही नुकसानग्रस्त शे्तकऱ्यांना हेक्टरी 25 हजार रुपयांची मदत द्यावी अशी मागणी केली होती. परंतु शासनाने फक्त पाच हजार रुपयांची घोषणा केली. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या भाषणात सांगितले होते की, रस्त्यांची अवस्था वाईट झालेली आहे, जमिनी खरडून गेलेल्या आहेत, जमिनी वाहून गेल्या आहेत अशी दयनीय व भयानक अवस्था आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 12:15

श्री.विनोद तावडे....

शेतकऱ्यांना तातडीच्या मदतीची गरज असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात प्रतिपादित केले. आज आपण सर्वजण अधिवेशनासाठी जमलो आहोत. कोकणासह विदर्भातील सर्व जनता या अधिवेशनामध्ये कोणता निर्णय घेतला जातो याकडे लक्ष देऊन आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी 5 हजार रुपये नुकसान भरपाई देण्याची घोषणा केली. त्यानंतर सर्वेक्षणाच्या बाबतीत दिनांक 14 ऑगस्ट रोजी शासन निर्णय निर्गमित केला. तद्नंतर दि.30 ऑक्टोबर रोजी मदतीच्या वितरणाबाबत शासन निर्णय निर्गमित केला. त्यासाठी 200-250 कोटी रुपये आकस्मिकता निधीतून घ्यावे असे ठरले. वास्तविक पाहता आकस्मिकता निधीची मागणी करावयाची होती तर ती जुलै-ऑगस्ट महिन्यामध्येच करता आली असती. परंतु त्या वेळी मागणी न करता ऑक्टोबर महिन्याच्या शेवटी केली. तसेच ती रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मार्च, 2014 पर्यंत अदा करण्याबाबतचा जी.आर. काढला. महोदय, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची पिके वाहून गेली, त्यांना खाण्यापुरते सुध्दा धान्य नाही असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. असे असताना मार्च-2014 पर्यंत त्यांना नुकसान भरपाई अदा करावी अशा प्रकारचा जी.आर. काढून या शासनाने एकप्रकारे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची थट्टा केली.

महोदय, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी 25 हजार रुपये नुकसान भरपाई देण्याची मागणी आम्ही केली होती. परंतु शासनाने प्रत्यक्षात केवळ हेक्टरी 5 हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचे जाहीर केले. हेक्टरी 5 हजार रुपये मिळून जी रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देणे आहे ती अजूनपर्यंत त्यांना देण्यात आलेली नाही. आतापर्यंत केवळ 450 कोटी रुपये दिले आहेत. शेतकऱ्यांना जास्त मदतीची गरज असताना अल्प मदत देऊन या सरकारने शेतकऱ्यांची थट्टा केली आहे.

महोदय, विदर्भात अधिवेशन सुरु असताना जनतेमध्ये शासनाप्रती प्रचंड असंतोष आहे. काल सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी स्वत: शेतकऱ्यांसोबत रास्ता रोको आंदोलन केले. माझा सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, सरकारने शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेतल्या पाहिजेत. या विषयाची तातडी लक्षात घेता या विषयावर सभागृहामध्ये आज चर्चा केली पाहिजे. ही चर्चा सुरु करण्यापूर्वी सरकारने अगोदर पॅकेजची घोषणा केली पाहिजे. आम्ही गेल्या वेळी अगोदर चर्चा केली आणि त्यानंतर सरकारकडून पॅकेज जाहीर करण्यात आले. आमची मागणी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

आहे की, आज सुरुवातीला पॅकेज जाहीर केले पाहिजे आणि त्यानंतर या विषयावर चर्चा सुरु केली पाहिजे.

महोदय, मी पुनश्च विनंती करतो की, आजचे सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेवून मी नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेवर प्राधान्याने चर्चा घ्यावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये सभागृहाचे कामकाज स्थगित करुन अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत चर्चा घेण्याबाबत सूचना दिलेली आहे. महोदय, जुलै महिन्यामध्ये विदर्भ, कोकण आणि विदर्भाला लागून असलेल्या मराठवाड्यातील काही भागांत नेहमीपेक्षा दुप्पट पाऊस पडला. गेल्या 25 वर्षांत जेवढा पाऊस झाला नाही तेवढा पाऊस या वर्षीच्या पावसाळ्यात झाला. त्यामुळे शेतीतील सर्व पिके उद्ध्वस्त झाली. अतिवृष्टीमुळे आलेल्या महापुरात शेतीतील पिके वाहून गेली. एवढेच नव्हे तर जमीन सुध्दा खरडून गेली. त्यामुळे शेतकऱ्यांनी रब्बी पिके घेण्याचा प्रयत्न केला. माननीय मुख्यमंत्र्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीची घोषणा करुन देखील त्यांना मदत मिळाली नाही.

महोदय, शेतकरी सावकारांकडून कर्ज काढून आता रब्बीचे पीक घेण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार, ऊर्जा विभागाने शेतकऱ्यांचे विजेचे कनेक्शन तोडले. विदर्भात जे ट्रान्सफॉर्मर पाठविले ते जळालेले होते. मी तर म्हणेन की, त्या ठिकाणी सरकारने सदोष ट्रान्सफॉर्मरचा पुरवठा केला. शेतकऱ्यांच्या शेतीतील विजेचे कनेक्शन तोडल्यामुळे तसेच सदोष ट्रान्सफॉर्मर पाठविल्यामुळे शेतकरी आपल्या पिकाला पाणी देऊ शकत नाही. अशी शेतकऱ्यांची स्थिती झाली. या परिस्थतीत कापसाचे थोडेफार पीक वाचले. परंतु त्यावर सुध्दा 'लाल्या' रोग पडला. त्यामुळे कापसाचे उत्पादन घटले. त्यातच कापसाला केवळ प्रती क्विंटल 3800 रुपये हमी भाव जाहीर केल्यामुळे पणन महासंघाने 100 कापूस खरेदी केंद्रे उघडून सुध्दा त्यांना आजपर्यंत एक बोंड सुध्दा कापूस मिळाला नाही.

महोदय, या सरकारने कापूस उत्पादकांबरोबरच सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची थट्टा केली. सोयाबीन पिकाला केवळ 2800 रुपये भाव जाहीर करण्यात आला. या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या शेतात केवळ क्विंटल-दीड क्विंटल कापूस पिकला होता. परंतु त्यांना तो केवळ

..3..





श्री.पांडुरंग फुंडकर....

2800 रुपये दराने विकावा लागला.  अडचणीच्या काळात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पुरेसा भाव मिळाला नाही.  अतिवृष्टीमुळे विदर्भ, मराठवाडा आणि कोकणातील शेतकरी उद्ध्वस्त झाला. या निमित्ताने माझी मागणी आहे की, अतिवृष्टीमुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना त्वरित मदत मिळाली पाहिजे.

महोदय, विदर्भातील चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, वाशिम या जिल्ह्यांतील नुकसानग्रस्त भागाला माननीय मुख्यमंत्र्यांनी भेट दिली.

नंतर श्री.कांबळे....

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

त्यांनी आलेल्या दारूण परिस्थितीचे चित्र पाहिल्यानंतर सुध्दा मदत मिळाली नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी या संदर्भात सांगितले. शेतकऱ्यांची काय थट्टा लावली आहे ? शेतकऱ्यांना 200 रूपयांचा चेक मदत म्हणून देता, हे बरोबर नाही. 5 हजार रूपये हेक्टरी मदत जाहीर करूनही शेतकऱ्यांना 200 रूपयांचा चेक देत असाल तर ही शेतकऱ्यांची क्रूर थट्टा आहे. म्हणून अगोदर मदत जाहीर झाली पाहिजे आणि मगच सभागृहात चर्चा झाली पाहिजे, अशी मागणी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केली आहे, त्या मागणीला मी समर्थन देतो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावावर चर्चा घेण्याचा मुद्दा मांडला आहे. तो महत्त्वाचा आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या संदर्भात सांगितले आहे. सर्वांनी दूरदर्शनवर व इतर चॅनेलवर माननीय मुख्यमंत्र्यांना या भागात सर्व्हे करताना पाहिले आहे. सर्व्हेच्या वेळी व नंतर प्रेस कॉन्फरन्समध्ये, या संदर्भात ताबडतोब मदत जाहीर करणार आहोत आणि ती मदत ताबडतोब त्या शेतकऱ्यांना दिली जाईल, असे त्यांनी सांगितले आहे. परंतु, शेतकऱ्यांच्या वाट्याला काहीच आले नाही. विदर्भात अधिवेशन सुरू आहे. विदर्भातील शेतकऱ्यांची व कोकणातील शेतकऱ्यांची दयनीय अवस्था आहे, हे सुध्दा मी सांगू इच्छितो. 5 हजार रूपये हेक्टरी मदत घोषित करण्यात आली. परंतु, अगोदर सांगितले होते की, किमान 25 हजार रूपये हेक्टरी मदत असेल. ही शेतकऱ्यांची क्रूर थट्टा आहे. विदर्भावर अन्याय झाला तसा कोकणावरही वेळोवेळी अन्याय झाला, याची दखल आपण घेतली पाहिजे. या चर्चेला ताबडतोब परवानगी देण्याच्या अगोदर, शासन या संदर्भात काय मदत देणार आहे, हे सांगितले पाहिजे. चर्चेचे गुऱ्हाळ न लावता शासनाने मदत घोषित केली पाहिजे आणि चर्चेला ताबडतोब सुरूवात केली पाहिजे, अशी माझी विनंती आहे. 6449 कोटी रूपयांचे पॅकेज ताबडतोब घोषित करावे, अशी या प्रस्तावाद्वारे मागणी केली आहे. आपण आमच्या रक्षणासाठी राज्य शासनाला या संदर्भात सांगावे आणि या संदर्भातील मदत ताबडतोब घोषित करून विदर्भातील शेतकऱ्यांना, कोकणातील शेतकऱ्यांना या संकटापासून वाचवावे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी म.वि.प. नियम 289 अन्वये तातडीची चर्चा सभागृहात मागितली आहे, त्याबाबत समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सभागृहात अनेक वेळा ग्लोबल वॉर्मिंग बाबत चर्चा केली आहे. ग्लोबल वॉर्मिंगचा परिणाम आज सुध्दा दिसत आहे. आज सुध्दा कोकणात पाऊस पडत आहे. मी इकडे येण्यास निघालो त्यावेळी कोकणात पाऊस होता. शेतात तयार झालेली पिके पाण्यामध्ये तुडूंब भरली आहेत. जुलै महिन्यात पाऊस पडला. माझ्या रायगड जिल्ह्यात सरकारच्या सर्वेक्षणामध्ये 31 हजार हेक्टर बाधित क्षेत्र नोंदीत झाले. त्यामुळे 57731 शेतकऱ्यांना फटका बसला. परंतु, नुकसानभरपाई म्हणून एकही रूपया मिळाला नाही. गेल्या वर्षी माननीय मुख्यमंत्र्यांनी नुकसानभरपाई देण्याचा निर्णय जाहीर केला. परंतु, तरी सुध्दा ते पैसे आमच्या जिल्ह्यात दिले गेलेले नाहीत. सभागृहाचे आजचे संपूर्ण कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा व्हावी. सरकारने ठोस निर्णय देऊन ताबडतोबीने शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी आम्ही मागणी करीत आहोत

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर, डॉ. दीपक सावंत, श्री. जयंत प्र. पाटील यांनी म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावावर चर्चा घेण्याच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला. अतिवृष्टी झाली आहे आणि आजही होत आहे. परतीचा पाऊस मराठवाड्यात पडला, कोकणात पडला. सदर बाबतीत शासनाची भूमिका काय असावी, या बाबतीत मत प्रदर्शित केले गेले. मी या चर्चेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील जनतेला, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना व इतर सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, राज्य शासनाची या विषयावर चर्चा करण्याची तयारी आहे. यावेळी चहापानाचा कार्यक्रम घेता आला नाही. आतापर्यंतची पध्दत अशी आहे की, अधिवेशन सुरू होण्याच्या अगोदर सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना चहापानासाठी बोलाविले जाते आणि चर्चा केली जाते. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, राज्य शासनाची कोणत्याही विषयावर चर्चा करण्याची तयारी आहे. फक्त सभागृहाचे कामकाज न थांबता चर्चा करावी. विदर्भात अधिवेशन होत आहे.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे, मोहन जोशी, प्रा.सुरेश नवले, श्री.रमेश शेंडगे व इतर सन्माननीय सदस्यांनी वीज व जलसंपदा या विषयाच्या संदर्भात नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी विजेच्या संदर्भात उपस्थित केलेल्या विषयासंबंधी चर्चेनंतर शासनाची भूमिका स्पष्ट केली जाईल. माझी आपल्याला व सभागृहाला विनंती आहे की, आता नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेवरील चर्चा सुरु करण्यात यावी. त्यासाठी आपण अडीच तासाचा वेळ निश्चित करावा. दुपारी 3 वाजेपर्यंत ती चर्चा पूर्ण होईल.

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विदर्भातील अतिवृष्टीवर नियम 289 अन्वये चर्चा करण्याची मागणी केलेली आहे. आज माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी दोन्ही सभागृहात पुरवणी मागण्या सादर केलेल्या आहेत. ग्लोबल वॉर्मिंगमुळे जे संकट उद्‌भवलेले आहे त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी केलेला आहे. त्याबद्दल राज्य सरकारने पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून तरतूद केलेली आहे. राज्य सरकारने सी.एफ.ॲडव्हान्स घेऊन पॅकेज जाहीर केले होते त्याबाबतही शासनाला सभागृहाला माहिती देता येईल. आज कितीही वेळ कामकाज करण्याची सरकारची तयारी आहे. त्यामुळे दुपारी 3 वाजेपर्यंत विदर्भातील वीज व जलसंपदा या विषयावरील चर्चा करावी आणि नियम 289 अन्वये प्रस्तावावरील चर्चा दुपारी 3 ते संध्याकाळी 6 वाजेपर्यंत पूर्ण करण्यात यावी. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी व आपण संमती दिली तर आजच्या कामकाज पत्रिकेवरील लक्षवेधी सूचनेचे कामकाज उद्या घेण्यात यावे. परंतु दोन्ही प्रस्तावांवरील चर्चा आजच पूर्ण करण्याची शासनाची भूमिका आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सरकारच्या आश्वासनावर विश्वास ठेवून आम्ही जुलै महिन्यातील अधिवेशनामध्ये चर्चा केली होती. त्यानंतर शासनाने तुटपुंजे पॅकेज जाहीर केले होते ते सुध्दा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेले नाही. मार्च, 2014 अखेर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार आहे. पण शेतकऱ्यांचे नुकसान खूप अगोदर झालेले आहे. त्यामुळे सरकारने प्रथम घोषणा करावी. त्याची अंमलबजावणी कशी करावी हे आम्ही सांगू शकतो. या विषयावर जुलैच्या अधिवेशनात सभागृहात आम्ही चर्चा केलेली आहे, शिष्टमंडळांनी वारंवार सरकारला भेटून निवेदने

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.......

दिलेली आहेत. हे सर्व प्रयत्न झालेले आहेत. शासनाची फक्त चर्चेची तयारी असते, घोषित काहीच केले जात नाही. सरकारने प्रथम घोषणा करावी अशी मी त्यांना विनंती करतो. माननीय उप मुख्यमंत्री हे वित्त मंत्री सुध्दा असल्यामुळे ते घोषणा करु शकतात. त्यामुळे त्यांनी प्रथम घोषणा करावी, त्यानंतर आम्ही सविस्तर चर्चा करण्यासाठी तयार आहोत.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी प्रथम चर्चा सुरु करावी. शासनाच्या उत्तरातून त्यांचे समाधान झाले नाही तर आपल्याकडे उद्याचा व परवाचा दिवस आहे. राज्यातील शेतकरी अडचणीत आहे त्याला मदत करण्याची भूमिका शासनाने पहिल्या दिवसापासून स्वीकारलेली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, 810 कोटीपैकी फक्त 450 कोटी रुपये शेतकऱ्यांपर्यंत गेले आहेत, उर्वरित मदत त्यांना का देण्यात आली नाही, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी प्रथम चर्चा करावी, त्यानंतर शासन घोषणा करील असे माननीय उप मुख्यमंत्र्यांचे म्हणणे आहे, परंतु यापूर्वीचे 810 कोटी रुपये शेतकऱ्यांपर्यंत का पोहोचले नाहीत ?

श्री.अजित पवार : शासनाने 450 कोटी रुपयांचा सी.एफ.ॲडव्हान्स घेतलेला आहे. त्यातून वाटप चालू आहे.

श्री.विनोद तावडे : शेतकऱ्यांचे नुकसान कधी झाले आणि शासन नुकसान भरपाई केव्हापासून देत आहे ?

श्री.अजित पवार : पुरवणी मागण्या मंजूर झालेल्या आहेत, त्यातून सरकार पैसे देणार आहे. केंद्र सरकारने सुध्दा राज्य सरकारला 922 कोटी रुपयांची मदत केलेली आहे.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना या विषयांवर चर्चा करावयाची नाही, त्यांना सभागृहात गोंधळ घालून सभागृहाचे कामकाज बंद पाडावयाचे आहे.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून घोषणा देत असतात. )

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, गेल्या वेळी आम्ही चर्चा केल्यानंतर शासनाने घोषणा केली होती. त्याचे पैसे शेतकऱ्यांपर्यंत अद्याप पोहोचलेले नसल्यामुळे सरकारच्या घोषणेवर आमचा विश्वास नाही. त्यामुळे शासनाने आपल्यासमोर घोषणा करावी व ते पैसे किती दिवसात शेतकऱ्यांना मिळतील ते सांगावे. मार्च, 2014 ही मुदत आम्हाला चालणार नाही. लोकांची यावेळची दिवाळी काळी गेली आहे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना देण्यात आली आहे. त्याबाबत मला निर्णय देणे आवश्यक आहे.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे व अन्य सन्माननीय सदस्यांचा नियम 260 अन्वये सिंचन आणि विजेच्या संदर्भातील प्रस्ताव आहे. या प्रस्तावाच्या संदर्भात देखील आपल्याला निर्णय घेतला पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाची सूचना देखील अत्यंत महत्वाची आहे. राज्यात नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे त्या संदर्भात शासनाने आतापर्यंत जे काम केलेले आहे आणि यापुढे जे काम करावयाचे आहे या संदर्भात चर्चा व्हावी अशी आपली अपेक्षा आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आपली भूमिका या ठिकाणी मांडलेली आहे. ज्याप्रमाणे नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव महत्वाचा आहे त्याचप्रमाणे आजच्या कामकाजामधील नियम 260 अन्वयेचा सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचा प्रस्ताव देखील महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी दिलेला प्रस्ताव ते उद्या मांडणार आहेत.

श्री. कपिल पाटील : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांच्या मुद्यावर मला बोलायचे आहे.

**सभापती** : त्या बाबत चर्चा झालेली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची जी सूचना दिलेली आहे तो विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये नसला तरी महाराष्ट्रात निर्माण झालेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये जी अविवृष्टी झाली त्यामध्ये शेतकऱ्यांचे अपरिमित नुकसान झालेले असल्यामुळे त्यावर चर्चा होणे आवश्यक आहे. त्यामुळे या चर्चेसाठी वेळ देण्याचे मी ठरविले आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी विदर्भातील सिंचनाची आणि विजेची परिस्थिती यासंदर्भात नियम 260 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. हे दोन्ही प्रस्ताव चर्चेला घेता यावेत या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की पहिल्या 2 तासामध्ये सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर चर्चा होईल आणि दुपारी 3.00 वाजता सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी नियम 289 अन्वये जी चर्चा मागितलेली आहे ती सुरु होईल.

..2..

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ येऊन घोषणा देत असतात. )

श्री. विनोद तावडे : आम्हाला चर्चा नको. शेतक-यांना पैसे केव्हा देणार यासंबंधी सरकारने घोषणा केली पाहिजे. मागील अधिवेशनामध्ये 810 कोटी रुपयाची घोषणा केली. परंतु ते पैसे अजूनही शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत. सभापती महोदय, शेतकऱ्यांचा सरकारवर विश्वास राहिलेला नसल्यामुळे ते आज आपल्याकडे आशेने पहात आहेत.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 289 अन्वये चर्चा मागितलेली असून आपण ती चर्चा करण्याचे मान्य केलेले आहे. या विषयावर चर्चा करण्याची सरकारची देखील तयारी आहे. शेतकऱ्यांना पैसे द्या असे विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. शेतकऱ्यांना पैसे देण्याचे काम चालू आहे. आपण चर्चा केली तर शेतकऱ्यांना आम्ही काय देणार आहोत हे चर्चेच्या उत्तरामध्ये सांगितले जाईल. सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना सभागृहाचे कामकाज चालवायचे नाही यासाठी ते सारख्या घोषणा देत आहेत.

**सभापती** : आता आपण नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा सुरु करु या. ही चर्चा संपल्यानंतर नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा सुरु करण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात. )

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.35 ते 12.55 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही मघापासून आग्रहाने सांगत आहोत की, सरकारने विदर्भातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने पॅकेजची घोषणा करावी. विदर्भ अतिवृष्टीमुळे उद्ध्वस्त झाला आहे. या संदर्भात मागील अधिवेशनात सविस्तर चर्चा झालेली आहे. पुन्हा याच विषयावर चर्चा करण्याची आवश्यकता आहे असे आम्हाला वाटत नाही. विदर्भातील जनतेसाठी सरकारने ताबडतोब पॅकेज जाहीर केले पाहिजे अशी आम्ही आग्रही मागणी करीत आहोत. विदर्भातील जनतेवर अधिवेशनाच्या काळात अन्याय होणार असेल तर आम्ही तो सहन करणार नाही. सरकारने अगोदर पॅकेज जाहीर करावे आणि नंतर चर्चा घेण्यात यावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मागील अधिवेशनात आम्ही विदर्भातील अतिवृष्टीबद्दल चर्चा केली होती. त्या विषयाची निकड लक्षात घेऊन सरकारने तुटपुंजी 810 कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती. त्यापैकी 450 कोटी रुपये अद्याप दिले गेलेले नाहीत. अशा परिस्थितीत आम्ही शासनाच्या घोषणेवर किती विश्वास ठेवावा? म्हणून आमची आग्रहाची मागणी आहे की, शासनाने अगोदर पॅकेज जाहीर करावे व त्यानंतर चर्चा घेण्यात यावी.

(सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

**तालिका सभापती** : सभागृहातील परिस्थिती लक्षात घेता कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 57 मिनिटांनी बुधवार, दिनांक 11 डिसेंबर, 2013 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही